**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४/२०२६ – निशाणी क्र.१ खालील आदेश**

श्रीमती महानंदा विजयकुमार तारळकर वि. कोणीही नाही.

CNR No. MHSO2000-0162-2026

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन असे की, अर्जदार व मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचा हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे व जाती रिती रूढी रिवाजाप्रमाणे विवाह झालेला आहे. या विवाह संबंधातून अर्जदार व मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांना सृष्टी विजयकुमार तारळकर व वृषाली विजयकुमार तारळकर ही अपत्ये झालेली आहेत. अर्जदारचे पती विजयकुमार हे दि.१५/११/२०२५ रोजी उषःकाल अभिनव इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस सांगली येथे मयत झाले आहेत.

३. अर्जदार यांचे पुढील कथन असे की, मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे नावे देशी दारू विक्रीचे लायसन्स असून त्याचा लायसन्स नंबर सीएल-३ क्र.७९ असा आहे. अर्जदार हे मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र.१ ते ३ व्यतिरीक्त मयत विजयकुमार भानुदास तारळकर यास कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी विजयकुमार भानुदास तारळकर यांचे मृत्यूपश्चात त्यांचे नावे जवळा गावी नमूद असलेली देशी दारू लायसन्स नंबर सीएल-३ क्र.७९ हे अर्जदार यांचे नावावर होणेसाठी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचेकडे अर्ज दिला होता. त्यांनी अर्जदार यांना मे.कोर्टातून विजयकुमार भानुदास तारळकर यांचे मृत्यूपश्चात वारस दाखला सादर करणेबाबत अर्जदार यांना दि.१/१/२०२६ रोजी पत्राने कळवले. सबब, अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

४. अर्ज दाखल झाल्यानंतर दि.०१/०२/२०२६ रोजीच्या "पुढारी" मध्ये जाहीर घोषणा देण्यात आली होती. सदर दैनिकमधील संबंधीत जाहीर घोषणा निशाणी क्र.१४ दाखल आहे. त्याचप्रमाणे मौजे जवळा, ता. सांगोला, जिल्हा सोलापूर येथे जाहीर प्रगटण दर्शनी भागावर डकविल्याबाबतचा बेलिफ यांचा अहवाल दाखल आहे.

अर्जाला कोणाचाही आक्षेप आजतागायत आलेला नाही. अर्जदार यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.१९ कडे तसेच अर्जदार तर्फे साक्षीदार वृषाली विजयकुमार तारळकर यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.९,अर्जदार तर्फे साक्षीदार सृष्टी विजयकुमार तारळकर यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.१०, अर्जदार तर्फे साक्षीदार अनिल त्रिंबक तारळकर यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.११ कडे दाखल केले आहे.

५. अर्जदार यांनी नि.४/१ कडे विजयकुमार भानुदास तारळकर यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता विजयकुमार भानुदास तारळकर यांचा दि.१५/११/२०२५ रोजी मृत्यू झाल्याचे दिसून येते.

६. अर्जदाराच्या दाव्यास कोणाचाही आक्षेप न आल्याने त्यांनी नमूद केलेली नाती व त्यांचे कथन या बाबी बरोबर आहेत हे जास्त संभाव्य वाटते. त्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबतचा वारसा दाखला देणे न्यायोचित होईल असे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे दिसुन येते. साक्षीदार वृषाली विजयकुमार तारळकर व सृष्टी विजयकुमार तारळकर यांनी त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये श्रीमती महानंदा विजयकुमार तारळकर ही कायदेशीर वारस आहे असे वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत नसल्याचे सांगितले आहे. कायद्याच्या गृहीतकांनुसार वारस प्रमााणपत्र (Heirship Certificate) मयत मृत व्यक्तिच्या मालमत्तेसंदर्भात कोणतेही हक्क संबंध ठरवत नाही. वारस प्रमाणपत्र केवळ कायदेशीर वारसांना अधिकृत करते. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ श्रीमती महानंदा विजयकुमार तारळकर, अर्जदार क्र.२ सृष्टी विजयकुमार तारळकर व अर्जदार क्र.३ वृषाली विजयकुमार तारळकर हे मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसाचे प्रमाणपत्र (Heirship Certificate) निर्गमीत

करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी आवश्यक त्या कोर्ट फी ची पूर्तता करावी.

४. अर्जदारांनी हमीपत्र दाखल करावे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.16 17:22:57 +0530

ठिकाण – सांगोला
दिनांक – १६/०४/२०२६

**(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 16/04/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 16/04/2026 |